O. W. No. ४४१९/२०२५
Date ०४/१२/२०२५

# जिल्हा व सत्र न्यायालय, नागपूर

## संगणक युपीएस उपलब्ध करुन देण्यासाठी दरपत्रके/ निविदा (Tender) पत्रके मागविण्याकरीता सुचना

जिल्हा न्यायालय, नागपूर अंतर्गत येणारे सर्व न्यायालय व कार्यालयीन विभागातील संगणकाकरीता, 600 VA क्षमतेचे एकुण ५८० (रुपये १०,००,०००/- पर्यंत) उपलब्ध करुन देण्याकरिता, खालील दिलेल्या अटींवर दिनांक ११/१२/२०२५ रोजी सायंकाळी ५.०० वाजता पर्यंत "प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, नागपूर" यांचे नावाने सिलबंद निविदा (दरपत्रके) मागविण्यात येत आहे.

### अटी व शर्ती

सर्वसाधारण सुचना

१. जिल्हा न्यायालय, नागपूर अंतर्गत येणारे सर्व न्यायालय व कार्यालयीन विभागातील संगणकाकरीता खालीलप्रमाणे नमुद असलेल्या तांत्रिक तपशीलाचे (Technical Specification) युपीएस उपलब्ध करुन देण्याकरिता, दरपत्रके, खालील दिलेल्या नमुन्यात, विहीत मुदतीस सादर करणे गरजेचे आहे.

| अ. क्र. | UPS चे तांत्रिक तपशील (Technical Specification) | युपीएस करणाऱ्या कंपनीचे नाव व युपीएस चे मॉडेल | दर (प्रति युपीएस रु.) (कर/सर्व शुल्क अंर्तभुत करुन) | एकुण युपीएस | एकुण शुल्क रुपये (कर/सर्व शुल्क अंर्तभुत करुन) |
|---|---|---|---|---|---|
| १ | **Capacity-** 650VA/360W<br><br>**UPS Type**Line-interactive<br><br>**Battery**1 x 12V/7AH Sealed Maintenance-Free (SMF)<br><br>**Output Voltage**230V AC<br><br>**Waveform (Battery – Mode)**Modified Sine Wave<br><br>**Input Voltage Range**140V ~ 300V AC<br><br>**Transfer Time**Typical 4-8ms<br><br>**Charging Time-** 5 hours (to 95% capacity)<br><br>**Protection-** Overload, discharge, and overcharge protection<br><br>**Other Features-**Boost and Buck AVR, Auto Restart, Generator Compatibility<br><br>**Noise Level**<40dB<br><br>**Dimensions-** 11cm X 3.5 cm X 5.5 cm (LWH)<br><br>**Approximate Weight**<br>Net: 4 Kgs, Gross: 4.5 Kgs<br><br>**Onsite Warranty** – 2 Years | | | | |

२. आदरणीय प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश साहेब यांनी कोणतेही कारणांशिवाय संबंधीत निविदा/दरपत्रके पुर्णपणे रद्य करण्याचा किंवा त्यात बदल करण्याचा अधिकार राखुन ठेवलेला आहे. पुरवठा आदेश किंवा वार्षिक मुल्य करार निर्गमित करणेबाबत, आदरणीय प्रमुख जिल्हा न्यायाधीश साहेब यांचा निर्णय अंतिम राहील.

३. संबंधित दर हे पुढील १ वर्षापर्यंत वैध राहतील. कोणत्याही परिस्थीतीत दर वाढ होणार नाही. बाजारात संबंधीत वस्तुंचे दर कमी झाल्यास, आदरणीय प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश संबंधित विक्रेता/पुरवठादारास, त्या कमी मुल्यावर प्रिंटर कार्टेजेसचे पुरवठा करण्याकरिता आदेशीत करतील व तो आदेश संबंधित विक्रता यांना बंधनकारक असेल.

४. यशस्वी पुरवठादारास, युपीएस पुरविण्याचा आदेश प्राप्त होताच पुढील १० कार्यालयीन दिवसांच्या आत युपीएस चा पुरवठा करणे बंधनकारक राहील.

५. निविदा/वार्षिक मुल्य करार पत्रके, सादर करणारे विक्रेता/पुरवठादार शासनाच्या कोणत्याही विभागातुन Blacklisted नसावे.

६. उपरोक्तप्रमाणे युपीएस दरपत्रके/वार्षिक करार पत्रके सादर करतांना युपीएसचा पुरवठा करण्याकरिता आवश्यक असलेले सर्व प्रकारचे शुल्क (युपीएसचे मुल्य, सर्व प्रकारचे कर, परिवहन शुल्क ईत्यादी सर्व) समावुन सादर करावे. उपरोक्त एकुण शुल्क व्यतिरीक्त अन्य कोणतेही शुल्क देय राहणार नाही.

७. पुरवठादार/विक्रेता यांचे न्यायालयीन कर्मचा-यांसोबत कोणतेही हितसंबंध नसावे.

८. दरपत्रकासोबत पॅन कार्ड, जीएसटीनंबर, रजिस्ट्रेशन तसेच अनुभवसंबंधी आवश्यक असलेले सर्व प्रमाणपत्रे सादर करणे आवश्यक आहे.

मागील प्रकल्प अनुभव**(Past Project Experience)**

९. संबंधित पुरवठादारास कोणत्याही शासकिय/सार्वजनिक/खाजगी क्षेत्र/खाजगी उपक्रमात पुरवठा करण्याच्या किमान १ वर्षाचा अनुभव असणे बंधनकारक आहे.

पुरवठयाची व्याप्ती **(Scope of Supply)**

१०. जिल्हा न्यायालय, नागपूर यांचे द्वारे एकमुश्त/आवश्यकतेनुसार युपीएस पुरवठा करण्याचे आदेश देण्यात येतील.

बँक गॅरंटी **(Bank Guarantee)**

- यशस्वी पुरवाठादारास एकुण पुरवठा किंमतीच्या ५% बँक हमी सादर करणे आवश्यक आहे.

हमी **(Warranty)**

११. युपीएस ची वॉरंटी किमान २ वर्ष (बॅटरी सोबत ) असणे गरजेचे आहे.

१२. पुरवठादार यांनी पुरवठा केलेली सर्व युपीएसची गुणवत्ता व कार्यक्षमता एकसारखी असावी याबद्यल हमीपत्र सादर करावे.

१३. युपीएसमुळे संगणकाचे कोणतेही हार्डवेअरचे नुकसान होणार नाही, याची सर्वस्व जबाबदारी विक्रेता/पुरवठादाराची असेल. विक्रेता/पुरवठादारास सदोष युपीएस (Defective UPS) पुढील ३ कार्यालयीन दिवसांच्या आत बदलुन द्यावे लागेल.

१४. आवश्यकतेनुसार विक्रेता/पुरवठादारास त्वरित सेवा व सहाय्यता पुरविणे आवश्यक असेल. समाधानकारक सेवा न पुरविल्यास, १५ दिवसांची आगाउ सुचना देउन आपली निविदा/करा रद्य करण्याचा अधिकार, आदरणीय प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश यांनी राखुन ठवलेला आहे.

१५. सेवा समर्थनासाठी समर्पित टोल फ्री क्रमांक/दुरध्वनी/मोबाईल क्रमांक पुरविणे आवश्यक असेल.

१६. समर्पिरत टोल फ्री क्रमांक/दुरध्वनी/मोबाईल क्रमांक आणि ईमेल आयडी चे वाढीव (Escalation Matrix) मॅट्रीक्स पुरविणे बंधनकारक आहे.

१७. आदरणीय प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, नागपूर यांचे नावाने ३ प्रतित आपल्या कार्यालयाचे देयक (Invoice) सादर केल्यावर १ महिण्याचे आत देयकांचे भुगतान NEFT/RTGS द्वारे करण्यात येईल.

१८. विहित नमुन्यामध्ये नसलेले निविदा/वार्षिक मुल्य करार पत्रके नामंजुर करण्यात येतील.

दिनांक : ०४/१२/२०२५

आदेशान्वये,

प्रबंधक
जिल्हा न्यायालय, नागपूर.

DISTRICT COURT, NAGPUR
जिल्हा न्यायालय, नागपूर